अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. १८ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २८९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## बाळे येथे जलवाहिनीला गळती; आज पाणीपुरवठा उशिरा

**सोलापूर** : उजनी ते सोलापूर दरम्यान बाळे येथे जलवाहिनीला मोठ्या प्रमाणात गळती झाल्यामुळे दुरुस्तीसाठी सोमवारी शटडाऊन घेण्यात आले होते. दरम्यान, दुरुस्तीच्या कामामुळे पाणी उपसा कमी होणार असल्यामुळे मंगळवार दि १८ जुलै रोजी शहरातील पाणीपुरवठा एक रोटेशन उशिरा, कमी वेळ व कमी दाबाने होणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. पाण्याची परिस्थिती बिकट असताना आता उजनी ते सोलापूर दरम्यान बाळे येथे जलवाहिनीला मोठ्या प्रमाणात गळती झाली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले आहे. येथील गळती तातडीने दुरुस्ती करण्यासाठी शटडाऊन घेऊन काम युद्ध पातळीवर सुरू आहे. दरम्यान, या शटडाऊनमुळे मंगळवारी शहराला पाणीपुरवठा कमी दाबाने, कमी वेळ येणार आहे, त्यामुळे नागरिकांनी काटकसरीने पाण्याचा वापर करावा.

## समाधान नगरातील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : अक्कलकोट रोडवरील समाधान नगरात राहणाऱ्या एका २८ वर्षीय अविवाहित तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. विश्वनाथ शरणाप्पा पकरे (वय २८ रा. समाधाननगर, अक्कलकोट रोड) असे मयताचे नाव आहे . काल रात्री घरात कोणी नसताना त्याने छताच्या लाकडी वाशाला साडीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत विश्वनाथ पकरे हा एका औषधाच्या दुकानात कामाला होता. त्याच्या पश्चात आई वडील आणि तीन विवाहीत बहिणी असा परिवार आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही . पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शेतकऱ्याला २५ लाखांना गंडवलेल्या तिघा भामट्यांच्या मुसक्या आवळल्या

- पाचपट नोटा देण्याचे दाखवले आमिष
- सोलापूर पोलिसांची बुलढाण्यात कारवाई
- एक कार आणि १७ लाखांची रोकड जप्त

सुराज्य/सोलापूर

**माळशिरस तालुक्यातील मेडद येथील एका शेतकऱ्याला २५ लाखांना गंडवलेल्या तिघा भामट्यांच्या मुसक्या सोलापूर ग्रामीण पोलिसांनी आवळल्या. अवघ्या दोनच दिवसात बुलढाण्यात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी खाक्या दाखवताच त्या दोघांनी गुन्हा कबूल केल्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडून १७ लाखांची रोकड जप्त केली. दरम्यान या तिघा आरोपींना सोलापुरात आणल्यानंतर सोमवारी माळशिरसच्या न्यायालयात हजर करण्यात आले.या तिघांनाही तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली.**

नवनाथ उर्फ नाथा शिवाजी भालचिम(वय ३९,रा. धानोरी ता.हवेली,जिल्हा पुणे), शकील उमर शेख(वय ३९ रा.संग्रामनगर जि.बुलढाणा) व शिवाजी शंकर लोणकर(वय ४२, रा.बुलढाणा) अशी आरोपींची नावे आहेत.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, नामदेव वलकुंदे (रा.मेडद) यांचा माळशिरस परिसरात गॅरेजच्या व्यवसाय आहे. त्यांचे मामा असणारे शेतकरी सोमनाथ वाघमोडे हे भांबुर्डी येथे राहतात. पुण्यातील त्यांच्या परिचयात असलेल्या नवनाथ उर्फ नाथा याने वाघमोडे यांना आमच्याकडे दोन हजार रुपये किमतीच्या भरपूर नोटा आहेत. तुम्ही आम्हाला शंभर आणि पाचशे रुपयाच्या नोटा दिल्यास आम्ही तुम्हाला पाचपट दोन हजाराच्या नोटा देतो, असे सांगून विश्वास संपादन केला होता. चालू चलनातील २५ लाखांच्या नोटांच्या मोबदल्यात पाचपटीने दोन हजार रुपयांच्या नोटा म्हणजेच सव्वा दोन कोटी रुपये किमतीच्या नोटा देण्याचे आमिष आरोपींनी दाखवले होते.



त्याप्रमाणे सोमनाथ वाघमोडे यांनी शनिवारी दुपारी नवनाथ उर्फ नाथा आणि त्याच्या साथीदारांना २५ लाख रुपये दिले. त्यानंतर तिघांनी पैसे घेऊन पोबारा केला. आपली फसवणूक झाल्यानंतर नामदेव जयराम वलकुंदे (वय २९,रा मेडद) यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे माळशिरसच्या पोलिसांनी नवनाथ उर्फ नाथा (रा वाघोली जि .पुणे) आणि त्याच्या दोघा साथीदाराविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. माळशिरसच्या पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून रविवारी बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील टुनकी येथे कारवाई करत शिवाजी लोणकर आणि त्याच्या सोबतच असलेला आरोपी नवनाथ या दोघांना ताब्यात घेत त्यांच्याकडून सतरा लाख रुपये जप्त केले.

### आर्टिका कार जप्त...

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस येथे पोलिसांनी गुन्हा नोंदवून बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर येथे कारवाई केली. शेख शकील, शेख उमर राहणार धामणगाव गोतमारे तर संग्रामपूर तालुक्यात असलेल्या टुणकी येथे शिवाजी लोणकर यास ताब्यात घेतले. यातील तिसरा आरोपी नवनाथ उर्फ नाथा याला पुणे जिल्ह्यातील वाघोली येथून ताब्यात घेतले आहे. यावेळी आरोपींनी वापरलेली आर्टिका कार पोलिसांनी जप्त केली आहे,असे बुलढाण्याचे वृत्त आहे.

### तामगाव पोलिसांची मदत

आरोपी हे २५ लाख रुपये घेऊन बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूरकडे रवाना झाल्याची माहिती सोलापूर पोलिसांना मिळाल्यावर सोलापूर पोलिसांनी तात्काळ बुलढाण्यातील तामगाव पोलिसांना संपर्क केला. सदरहू आरोपींवर लक्ष ठेवण्याची विनंती केली. याप्रकरणी तामगाव पोलिसांनी सोलापूर पोलिसांना चांगली मदत केली. या आरोपींना कव्हर करत अटक करण्यास मदत केली. त्यामुळे आरोपींजवळून १७ लाख रुपये जप्त करणे सोलापूर पोलिसांना सहज शक्य झाले. पुढील तपास माळशिरसचे फौजदार पुजारी करीत आहेत.

## मंगळवेढ्यात ५ हजारांची लाच घेताना ग्रामपंचायत कर्मचारी व तलाठी चतुर्भूज

सुराज्य/लक्ष्मीदहीवडी

मंगळवेढा तालुक्यात भीमा नदीतून काढलेल्या बेकायदेशीर वाळूची कारवाई न करण्यासाठी पाच हजारांची लाच घेणाऱ्या ग्राम पंचायत कर्मचारी व तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. श्रीमंत मसाजी भालेराव, (वय ५० ग्रामपंचायत कर्मचारी, रा.बठाण), व गजानन शंकरराव चाफेकर, (वय-३२, तलाठी सज्जा मुंढवी तसेच अतिरिक्त कार्यभार सजा बठाण, मूळ गाव उमरबटी, ता. मुखेड, जि. नांदेड. सध्या रा. मंगळवेढा) हे लाच घेताना रंगेहाथ पकडले गेले.

यातील तक्रारदार यांचे घराचे बांधकाम चालू असून, बांधकामासाठी वाळू कमी पडल्याने तक्रारदार यांनी त्यांचे गावाजवळून बठाण हद्दीतून जाणाऱ्या नदीतून वाळू काढल्यामुळे तक्रारदार यांच्यावर यासाठी कारवाई न करण्यासाठी म्हणून ५ हजार रुपये लाचेची मागणी केली. म्हणून तक्रार प्राप्त झाली होती. प्राप्त तक्रारी नुसार केलेल्या पडताळणीमध्ये कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ५०००/- रुपये लाचेची मागणी करून, ते स्विकारण्याचे मान्य केले.

सोमवारी सापळा कारवाईमध्ये यातील आरोपी भालेराव लाचेची रक्कम स्वीकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. आहे. त्यानंतर दोघांनाही ताब्यात घेण्यात आले असून, मंगळवेढा पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू होती. ही कारवाई चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर, पोलीस अंमलदार पोह प्रमोद पकाले, पोना संतोष नरोटे, पोकों गजानन किणगी, चापोह राहुल गायकवाड, नेम एसीबी सोलापूर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

### ... यांना आशिर्वाद कुणाचा

दोन महिन्यांपूर्वी रस्ता केस प्रकरणांमध्ये तलाठी व एक झिरो लाचलुचपतच्या जाळ्यात सापडला होता. सुमारे दोन महिने तो तलाठी व झिरो कारागृहात बंद होता. नुकताच तो तलाठी सुटला असताना सध्या दुसरा तलाठी व ग्रामपंचायत कर्मचारी लाचलुचपतने बंद केला आहे. नुकतेच गावभेट दौऱ्यामध्येही प्रांत ऑफिस मधील कर्मचारी दाखल्यासाठी एजंटांमार्फत पैशाची मागणी करत असल्याची तक्रार आमदार आवताडे यांनी प्रांत अधिकाऱ्याला केली होती. त्यानंतर काही दिवसातच तलाठी वाळू प्रकरणांमध्ये जेरबंद झाला आहे. त्यामुळे महसूल प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणावर लाचखोरी सुरू असल्याचे दिसून येत असून यांना नेमका आशीर्वाद कुणाचा याचाही तपास होणे गरजेचे आहे.

## अनवलीतील इसमाचा रांजणीच्या फॉरेस्टमध्ये खून

**पंढरपूर** : पंढरपूर तालुक्यातील अनवली येथील येथील अभिमान मारुती मिटकरी (वय ५५ ) यांचा धारदार शस्त्राने खून झाला आहे. यासंबंधी फिर्याद दिगंबर अभिमान मिटकरी यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे. खून झालेल्या ठिकाणी पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांनी भेट दिली.



मयत अभिमान मारुती मिटकरी हे रांजणी ता. पंढरपूर गावाच्या हद्दीतील फॉरेस्टमध्ये जखमी अवस्थेत आढळले. त्यांच्या डोक्याला पाठीमागून धारदार शस्त्राने मारल्यामुळे ते गंभीर जखमी झाले होते. त्यातच त्यांचा मृत्यू झाला आहे. याबाबतची फिर्याद त्यांच्या मुलगा दिगंबर अभिमान मिटकरी यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे. अज्ञात व्यक्तीच्या विरोधात ३०२ चा गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्यातील आरोपींच्या शोधासाठी वेगवेगळी पथके तयार केली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक मिलिंद पाटील यांनी दिली आहे.

## अकोलेकाटी येथे ग्रामसेविका महिलेस दहा हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले

सुराज्य/सोलापूर

हॉटेल व लॉजिंगसाठी आवश्यकअसलेला ग्रामपंचायतचा ठराव व ना हरकत दाखला देण्यासाठी दहा हजारांची लाच घेणाऱ्या ग्रामसेविकेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी रंगेहात पकडले. श्रीमती किर्ती अर्जुनराव वांगीकर (वय-४३, पद- ग्रामसेवक, ग्रामपंचायत, अकोलेकाटी ता.उत्तर सोलापूर) असे रंगेहात पकडण्यात आलेल्या ग्रामसेविकेचे नाव आहे.



यातील प्राप्त तक्रारीनुसार तक्रारदार यांचे हॉटेल व लॉजिंगसाठी आवश्यक असलेला ग्रामपंचायतचा ठराव व एन.ओ.सी.देण्यासाठी लोकसेवक किर्ती अर्जुनराव वांगीकर ग्रामसेवक,ग्रामपंचायत अकोलेकाटी ता.उत्तर सोलापूर यांनी दहा हजार रुपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम पंचायत समिती उत्तर सोलापूर या कार्यालयात सोमवारी १७ जुलै रोजी स्वतः स्वीकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.तसेच त्यांच्यावर सदर बझार पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. ही कारवाई गणेश कुंभार, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर. पोलीस अंमलदार सपोफौ, मल्लीनाथ चडचणकर, पोह.शिरीषकुमार सोनवणे, पोह. रशींद बाणेवाले, पोना श्रीराम घुगे, पोको.राजू पवार चालक राहुल गायकवाड (सर्व नेमणूक. अॅन्टी करप्शन ब्यूरो सोलापूर) यांनी केली.

## दुचाकीच्या धडकेत पादचारी व्यक्तीचा जागीच मृत्यू

सुराज्य/मोहोळ

पायी चालत निघालेल्या ५२ वर्षीय व्यक्तीला दुचाकीने धडक देऊन झालेल्या अपघातामध्ये त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकी वरील दोन जण जखमी झाल्याची घटना सोमवारी पहाटे एक वाजण्याच्या दरम्यान मोहोळ पंढरपूर पालखी मार्गावरील पेनूर हद्दीत दर्ग्याचे जवळ घडली.




भिवाजी सुदाम शिंदे हे पाटकुल ता.मोहोळ येथे बहीण असल्याने त्यांना भेटण्याकरिता जातो म्हणून घरातून गेले होते. दरम्यान सोमवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास देगाव येथील व्हाट्सअप ग्रुप वर पेनुर हद्दीत दर्ग्याजवळ पहाटे एक वाजता एक जणाचा मृत्यू झाला असून त्या व्यक्तीचा फोटो टाकण्यात आला होता.

तो फोटो भिवाजी शिंदे यांचा मुलगा गणेश शिंदे यांनी पाहिला व मोहोळ पोलिसांशी संपर्क करत ग्रामीण रुग्णालयात ठेवलेले प्रेत पाहिले असता ते भिवाजी शिंदे यांचेच असल्याची खात्री झाली.

मयत भिवाजी सुदाम शिंदे हे पाटकुलकडे पायी चालत जात असताना त्यांना समोरून विरूध्द दिशेने पंढरपूरकडे भरधाव वेगात जाणाऱ्या डबलसिट दुचाकी क्र.एम. एच.१३/ई.ए. ७९६४ वरील चालकाने धडक दिल्याने त्यात दुचाकी वरील ऋतुराज देवीदास वाघमारे, किशोर संजय वाघमारे (रा. सुस्ते ता. पंढरपूर) हे जखमी झाले आहेत.

## चिंतलवार वस्तीत भिंत ढासळल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर** : पावसाने जुनाट बांधकामाची भिंत ढासळून अंगावर पडल्याने ४५ वर्षीय इसम जागीच मयत झाले तर एकजण किरकोळ जखमी झाला. ही दुर्घटना मोदीखाना परिसरातील चिंतलवार वस्तीत रविवारी रात्रीच्या सुमारास घडली.


रामकृष्ण यल्लारेड्डी वंदिले (वय ४५ रा. चिंतलवार वस्ती) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. तर मैनोद्दीन इमामासाब शेख (वय ६०, रा.नई जिंदगी) हे जखमी झाले. गवंडी काम करणारे रामकृष्ण वंदिले हे काल रात्री १० वाजेच्या सुमारास पायी घराकडे निघाले होते. जिलानी शेख यांच्या स्क्रॅप दुकानाची जुनाट भिंत अचानक ढासळली. दगड आणि विटांच्या मलब्याखाली सापडल्याने ते जागीच मयत झाले. तर दुकान बंद करुन थांबलेले मैनोद्दीन शेख हे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

## २४३ विधी महाविद्यालयांना मान्यताच नाही

**मुंबई** : मागील काही वर्षात अनेकांचा कायद्याचे शिक्षण घेण्याकडे कल वाढत चालला आहे. मात्र, राज्यातील २४३ विधी महाविद्यालयांना बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यताच नसल्याचे समोर आले आहे. मुंबईसहित महाराष्ट्र राज्यात ३१६ महाविद्यालयांमध्ये विधी शिक्षण दिले जाते. परंतु २४३ महाविद्यालयात बार कौन्सिल ऑफ इंडिया यांची मान्यता किंवा परवानगी नुतनीकरण झाले नसल्याची बाब समोर आली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मौनम सर्वार्थ साधनम !!!

कल्याण
469-92-480


मेन बाजार
270-91-137

## शरद पवारांनी बंडखोरांना ठणकावले...

# मला कुणी भेटले तरी भाजपसोबत जाणारच नाही

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि समर्थक आमदारांनी सोमवारी पुन्हा एकदा ज्येष्ठ नेते शरद पवार यांची अचानक भेट घेतली. त्यानंतर राजकीय चर्चेला उधाण आले. काका-पुतण्यांचे नमके काय चाललेय?, असा प्रश्न सोशल मीडियावर उपस्थित केला गेला. दरम्यान पवारांनी अजितदादांसह त्यांच्या समर्थकांना ठणकावले. कुणी कितीही भेटले तरी आपण भाजपसोबत जाणार नाही, अशा स्पष्ट शब्दात पवारांनी निर्वाळा दिला. त्यामुळे भेटींच्या प्रकरणावर पडदा पडला आहे.



अजित पवार आणि समर्थक आमदार शरद पवार यांची मनधरणी करण्यासाठी पुन्हा वायबी चव्हाण सेंटर येथे गेले होते. त्यानंतर शरद पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. भाजपसोबत जायचा प्रश्नच उद्भवत नाही, अशी भूमिका शरद पवार यांनी घेतली आहे. लोक येऊन भेटले तरी भूमिकेत बदल होणार नाही, अशी भूमिका शरद पवार यांनी अजितदादा गटाकडे मांडल्याची माहिती मिळाली आहे. जित पवार आणि समर्थक आमदार सरकारमध्ये सामील झाले. त्यानंतर ते दुसऱ्यांदा शरद पवार यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी शरद पवार यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. पण शरद पवार यांनी कोणताही प्रतिक्रिया दिली नाही. अजित पवार, प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, अनिकेत तटकरे, विक्रम काळे, अतुल बेनके, अमोल मिटकरी, सुनील टिंगरे, सुनील शेळके, दत्तामामा भरणे, संजय शिंदे, अण्णा बनसोडे, संजय बनसोडे, इंद्रनील नाईक, सरोज अहिरे, राजु कारेमोरे या नेत्यांनी शरद पवार यांची वायबी सेंटर येथे जाऊन भेट घेतली. अजित पवार गटाकडून शरद पवारांना साकडे घालणे सुरू झालेय. त्यामुळे राज्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते संभ्रमात पडलेत. अजित पवारांना समर्थन देण्यासाठी कार्यकर्ते शंभर रुपयांच्या बॉण्डवर लिहून देतायेत. दुसरीकडे मात्र वेगळ्याच घडामोडी घडत असल्याने कार्यकर्ते ही बुचकळ्यात पडलेत. पण पवार कुटुंब एकत्र आले तर आमच्यावरही अशी वेळ येणार नाही, असे ते म्हणतायेत.

### मनात काय सुरु काहीच माहित नाही

शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर प्रफुल पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी सवाद साधला. शरद पवार यांच्याशी बातचीत झाली. राष्ट्रवादी एकत्रच ठेवण्याचा प्रस्ताव दिला. पण त्यांनी त्यावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही. त्यांच्या मनात काय सुरु आहे... हे माहित नाही, असे प्रफुल पटेल म्हणाले.